परिचर गट ड या संवर्गातील कर्मचा-यांना स्थायित्व प्रमाणपत्र देणेबाबत.

अहिल्यानगर जिल्हा परिषद
सामान्य प्रशासन विभाग-१
जि. प. आदेश क्र. साप्रवि-१/आस्था-४/०१/६२०/२०२५
अहिल्यानगर दिनांक — स्वाक्षरीत नमुद केल्याप्रमाणे

वाचा:-१. सामान्य प्रशासन विभागाकडील शासन निर्णय क्रं.एसआरव्ही-१०७५-दि.१९ सप्टेबर १९७५.
२. सामान्य प्रशासन विभागाकडील शासन परिपत्रक क्रं.स्थाप्रप-१४१४ प्र.क्रं.७३-१४-१३अ दि.११ सप्टेबर २०१४.

महाराष्ट्र शासनाने संदर्भिय निर्णयात-परिपत्रकात नमुद केलेनुसार प्रत्येक अस्थायी अधिका-यास/कर्मचा-यास स्थायित्व प्रमाणपत्र प्रथम नियुक्तीच्या पदावर तीन वर्षे पुर्ण झालेनंतर देणे आवश्यक आहे. त्यामुळे उपरोक्त संदर्भाधीन शासन निर्णय-परिपत्रके अधिक्रमित करुन त्यामधील सुचनांचा विचार करुन स्थायित्व प्रमाणपत्र प्रदान करणेसंदर्भात संदर्भ क्रं. २ अन्वयेच्या शासननिर्णयामध्ये पुढीलप्रमाणे सुचना दिलेल्या आहेत.

प्रथम नियुक्तीच्या पदावर तीन वर्षाची नियमित सेवापुर्ण करणा-या व पुढील शर्तीची पुर्तता करित असलेल्या अस्थायी शासकीय कर्मचाऱ्यांना स्थायित्व प्रमाणपत्र देणे आवश्यक आहे. त्याबाबत खालील अटी व शर्ती बंधनकारक राहतील.

१. कर्मचा-याची नेमणुक ही महाराष्ट्र जिल्हा परिषद (जिल्हा सेवा) सेवाप्रवेश नियम १९६७ चे नियमातील तरतुदीप्रमाणे झालेली असावी.
२. सदरील कर्मचा-यांची सेवा जिल्हा परिषदेमध्ये ३ वर्षापेक्षा जास्त झालेली असावी.
३. सेवेत रजु झालेनंतर सक्षम वैद्यकीय अधिका-याचे वैदयकीय प्रमाणपत्र सादर करुन त्या प्रमाणपत्राची पडताळणी संबधित कार्यालय प्रमुखांनी केलेली असावी.
४. कर्मचाऱ्याचा सेवाभिलेख उदा. गोपनीय अहवाल, उपस्थिती, सचोटी इ. चांगला असावा.

<u>स्थायित्व प्रमाणपत्र</u>

याव्दारे प्रमाणीत करण्यात येते की, उक्त शासन सामान्य प्रशासन विभागाकडील परिपत्रक दि.११ सप्टेबर २०१४ मधील सुचना क्रं. २ मध्ये विनिर्दिष्ट करण्यात आलेल्या सर्व शर्ती खाली नमुद करण्यात आलेल्या अस्थायी शासकीय कर्मचा-यांच्या बाबतीत पुर्ण झालेल्या आहेत आणि त्यानुसार ते कर्मचारी आवश्यक त्या सर्व प्रयोजनार्थ त्यांच्या नावासमोर स्तंभ क्रं ३ मध्ये नमुद केलेल्या पदांवर स्तंभ क्रं ५ मध्ये नमुद केलेल्या दिनांकापासुन स्थायी शासकीय कर्मचारी म्हणुन समजले जाण्यास पात्र आहेत.

| अ. नं. | शासकीय कर्मचा-याचे नांव व त्याचे सध्याचे पदनाम | ज्या पदावर स्तंभ क्रं २ मधील कर्मचा-यास स्थायित्व प्रमाणपत्र देण्यात येते त्या पदाचे पदनाम | प्रथम नेमणुक दिनांक | कोणत्या दिनांकापासुन देण्यात आले |
|---|---|---|---|---|
| १ | २ | ३ | ४ | ५ |
| १ | श्री. किसन मारुती जगताप | परिचर | १७/०१/२००८ | १७/०१/२०११ |

तरी वरील कर्मचा-यांना तीन वर्षाची नियमित सेवा पुर्ण करणा-या व वर नमुद केलेल्या अटी व शर्ती पुर्ण करणा-या अस्थायी कर्मचा-यांना स्थायित्व प्रमाणपत्र या आदेशाव्दारे प्रदान करण्यात येत असुन उक्त नमुद अट क्रं.१ ते ४ पुर्तता झालेची खात्री झालेनंतरच स्थायीत्व प्रमाणपत्राची नोंद संबधितांच्या मुळसेवापुस्तकात घेण्यात यावी.

सदर आदेश अहिल्यानगर जिल्हा परिषदेच्या www.nagarzp.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध करण्यात आला असुन त्याचा संगणकीय संकेतांक क्रं. 202512190402 असा आहे.

Signed by Rahul Ashok Shelke
Date: 19-12-2025 10:44:19

उप मुख्य कार्यकारी अधिकारी,
जिल्हा परिषद अहिल्यानगर.

प्रति,

वरीलप्रमाणे कर्मचारी.

व्दारा व प्रत- संबधित कार्यालय प्रमुख.

२/- सदर प्रमाणपत्राची संबधित कर्मचा-यांचे मुळ सेवापुस्तकात नोंद घेणेपुर्वी उक्त अट क्रं.१ ते ४ ची शहानीशा कार्यालय प्रमुखांनी संबधित कर्मचा-यांचे मुळ सेवापुस्तकावरुन करुन घेण्यात यावी व त्यानंतरच सदर प्रमाणपत्राची नोंद घेण्यात यावी व केलेल्या कार्यवाहीचा अहवाल तात्काळ सादर करावा.